भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/९०
डीसीएम(सीसी)क्र. जी-३/०३.३९.०१/२०१३-१४ जुलै ०१, २०१३

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व बँका

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक जनतेला ग्राहक-सेवा देण्याच्या कामगिरीवर आधारित बँक शाखांसाठी प्रोत्साहने व दंड देण्याची योजना**

कृपया आमचे महापरिपत्रक डीसीएम (सीसी) क्र.जी.३/०३.३९.०१/२०१२-१३ दि. जुलै ०२, २०१२ चा संदर्भ घ्यावा. ह्यात, करन्सी चेस्ट्स सह बँक शाखांसाठी त्यांच्या जनतेला ग्राहक-सेवा देण्याबाबतच्या कामगिरीवर आधारित, प्रोत्साहने व दंड देण्याबाबतची योजना दिली होती.

(२) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कारवाईंसाठी सोबतच्या जोडपत्रात ह्या योजनेची अद्यावत आवृत्ती दिली आहे.

(३) हे महापरिपत्रक, www.rbi.org.in ह्या आमच्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

आपला
(बी.पी. विजयेंद्र)
प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक.

**जोडपत्र**

**जनतेला ग्राहक-सेवा देण्याबाबतच्या कामगिरीवर आधारित, करन्सी चेस्ट्स सह बँक शाखांसाठी प्रोत्साहन व दंड ह्याबाबतच्या योजनेवरील महापरिपत्रक.**

(१) नोटा व नाणी बदलून देण्यासंबंधाने, सर्व बँक शाखा, जनतेला अधिक चांगली ग्राहक-सेवा देत आहेत ह्याची खात्री करण्यासाठी, करन्सी चेस्ट्स सह सर्व बँक शाखांसाठी प्रोत्साहने व दंड ह्यांची योजना सुरु करण्यात आली आहे.

(२) **प्रोत्साहने**
(अ) ह्या योजनेनुसार, नोटा व नाणी बदलून देण्यासाठी पुढीलप्रमाणे वित्तीय प्रोत्साहने मिळविण्यास बँका पात्र आहेत.

| अनुक्रमांक | **सेवेचा प्रकार** | **प्रोत्साहनांचा तपशील** |
|---|---|---|
| (१) | कमी बँका असलेल्या राज्यांमध्ये एक लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या केंद्रांमध्ये करन्सी चेस्ट्स उघडणे व सुरु ठेवणे | (अ) भांडवली खर्च : प्रति करन्सी चेस्टसाठी रु. ५० लाखाच्या मर्यादेत त्याच्या भांडवली खर्चाच्या ५०% रक्कम परत केली जाणे. ईशान्येकडील प्रदेशात, रु. ५० लाखाच्या मर्यादेत, १००% भांडवली खर्च परत मिळण्याची पात्रता असेल.<br>(ब) राजस्व खर्च : पहिल्या ३ वर्षांसाठीच्या राजस्व खर्चाच्या ५०% रकमेचा परतावा. ईशान्येकडील प्रदेशात पहिल्या ५ वर्षांसाठीच्या राजस्व खर्चाच्या ५०% रकमेचा परतावा. |
| (२) | बँक शाखांमधील काऊंटर्सवर, फाटक्या नोटा/मळक्या नोटांबाबतचा निर्णय घेणे. | (अ) मळक्या नोटा बदलून देणे : रु. ५० पर्यंतच्या मळक्या नोटांच्या प्रति पॅकेटसाठी रु.१.<br>(ब) फाटक्या नोटांबाबतचा निर्णय : प्रति नोट रु. २. |
| (३) | काऊंटरवर नाणी देणे | काऊंटरवर नाणी देण्या/वाटण्यासाठी, प्रतिथैली रु. २५/-. |
| (४) | नाणी देणारी मशीन्स स्थापन करणे विद्यमान प्रोत्साहने | पुढील बाबत प्रलोभनांचा विद्यमान स्तर<br>(अ) नागरी/महानगरी केंद्रांसाठी भांडवली खर्चाच्या ५०% रकमेचा परतावा आणि ग्रामीण व अर्ध ग्रामीण केंद्रांसाठी भांडवली खर्चाचा ७५% परतावा<br>(ब) करन्सी चेस्ट ठेवणा-या वाणिज्य बँकांसाठी लागु असल्याप्रमाणेच, नागरी सहकारी बँका, आणि आरआरबी (मग त्या करन्सी चेस्ट ठेवत असोत किंवा नसोत) ह्यांच्यासाठीही, रु.२५/- प्रति थैली एवढा राजस्व खर्चाचा परतावा. |
| | | |

(ब)(१) ही प्रोत्साहनात्मक रक्कम, प्रादेशिक कार्यालयात प्रत्यक्ष देण्यात आलेल्या मळक्या नोटांवरच देण्यात येईल. बँकांनी त्याबाबत वेगळा दावा/हक्क करु नये. करन्सी चेस्ट शाखेने, तिच्या संबंधित शाखांनी सादर केलेल्या मळक्या नोटांच्या आकारमानानुसार, त्या शाखांना ही प्रोत्साहनाची रक्कम देणे आवश्यक आहे.
(२) त्याचप्रमाणे मळक्या नोटांबरोबरच सादर केलेल्या, निर्णय घेतलेल्या नोटांबाबतचीही प्रोत्साहने दिली जातील. त्यासाठी वेगळी मागणी/दावा करु नये.

(३) नाणी वितरण करणारी यंत्रे स्थापन करण्यासंबंधीच्या आणि नाणी देण्या/वाटण्या संबंधीच्या मागण्या/दावे, ऑडिटरच्या प्रमाणपत्रासह, तिमाही धर्तीवर, तीस दिवसांच्या आत, संबंधित बँकेच्या लिंक ऑफिसमार्फत, आरबीआयच्या संबंधित इश्यु ऑफिसकडे सादर केले जावेत. येथे कृपया खात्री करुन घेतली जावी की, सीव्हीएमस कार्यरत राहण्यासाठी, नाणी थेट किंवा जोडणी प्रणाली मार्फत पुरविली जातील.

**(३) दंड**

(अ) आरबीआय/करन्सी चेस्टकडे पाठविलेली प्रेषणे/नोटा व नाणी बदलून देणे ह्यामधील त्रुटीबाबत बँकांना करावयाचे दंड पुढीलप्रमाणे आहेत —

| अनुक्रमांक | **अनियमिततेचा प्रकार** | **दंड** |
|---|---|---|
| (१) | मळक्या नोटांची प्रेषणे व करन्सी चेस्ट शिल्लकांमधील तूट (शॉर्टेजेस) | रु. ५० पर्यंतच्या मूल्याच्या नोटांसाठी तुटी/हानि व्यतिरिक्त प्रति नग रु. ५०/-. - रु.१०० व त्यापेक्षा अधिक मूल्याच्या नोटांसाठी - हानि/तोट्या व्यतिरिक्त, नोटेच्या मूल्याएवढे प्रति नग.<br>**प्रति प्रेषणात, १०० व त्यापेक्षा अधिक नगांच्या तुटीसाठी ताबडतोब डेबिट केले जाईल. संचयित अशा १०० नगांची मर्यादा गाठल्यास दंड केला जाऊ शकतो.** |
| (२) | मळक्या नोटा सादर करतेवेळी व करन्सी चेस्ट शिल्लकेमध्ये खोट्या नोटा आढळल्यास - | बँकांकडून आलेल्या व करन्सी चेस्ट शिल्लकांमधील मळक्या नोटा सादर करतेवेळी त्यात खोट्या नोटाही असल्याचे आरबीआयला आढळून आल्यास, त्या खोट्या नोटांच्या मूल्याच्या तिप्पट रकमेचा दंड केला जाईल.<br><br>एखाद्या बँक शाखेला किंवा करन्सी चेस्टला खोट्या नोटा आढळल्या असूनही त्यांनी त्याबाबत आरबीआय किंवा पोलिसांना कळविले नसल्याचे, आरबीआयच्या तपासणीत, स्नॅप तपासणी इत्यादींमध्ये दिसून आल्यास, कठोर कायदेशीर कारवाई आणि/किंवा पैशांच्या स्वरुपात दंड ह्यासह त्या बँके विरुध्द कठोर विनियामक उपाय केले जाऊ शकतात.<br><br>कोणतीही खोटी नोट सापडल्यास त्याबाबत ताबडतोब दंड केला जाईल. |
| (३) | मळक्या नोटा सादर करतेवेळी व करन्सी चेस्ट मधील शिल्लकांमध्ये खोट्या नोटा सापडल्यास | अशा नोटांचे मूल्य कितीही असले तरी त्याबाबत प्रति नग रु.५०/-<br>**प्रत्येक प्रेषणातील १०० किंवा त्यापेक्षा अधिक फाटक्या नोटांबाबत ताबडतोब डेबिट केले जाईल. संचयित अशा १०० नगांची मर्यादा गाठल्यास दंड लावला जाऊ शकतो.** |
| (४) | दिलेल्या कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचे, करन्सी चेस्टसद्वारा अनुपालन न केल्याचे आरबीआयच्या नजरेस आल्यास<br>(अ) सीसीटीव्ही चालत नसणे<br>(ब) शाखेची रोकड/कागदपत्रे स्ट्रॉंगरुममध्ये ठेवलेली असणे<br>(क) नोटा वेगवेगळ्या करण्यासाठी (सॉर्ट) | प्रत्येक अनियमिततेसाठी रु.५००० एवढा दंड - हीच चूक पुनः झाल्यास हा दंड रु.१०,००० पर्यंत वाढविला जाईल.<br>दंड ताबडतोब आकारला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | एनएसएमचा उपयोग न केला जाणे (काऊंटरवर मिळालेल्या उच्च मूल्याच्या नोटांचे किंवा चेस्ट/आरबीआयकडे पाठवावयाच्या नोटांचे सॉर्टिंग करण्यासाठी एनएसएमचा वापर न करणे) | |
| (५) | आरबीआयबरोबर केलेल्या करारातील (करन्सी चेस्ट उघडणे व ठेवणे) कोणत्याही अटीचे भंग केल्याचे किंवा अदलाबदलीची सुविधा देण्यात त्रुटी असल्याचे आरबीआयच्या नजरेस आल्यास, उदा.<br><br>(अ) पुरेसा साठा असूनही जनतेमधील कोणालाही काऊंटरवर नाणी न देणे<br>(ब) कोणत्याही शाखेने मळक्या नोटा बदलून देण्यास नकार देणे/जनतेमधील कोणीही सादर केलेल्या फाटक्या नोटांबाबत, कोणत्याही करन्सी चेस्टने निर्णय घेण्यास नकार देणे<br>(क) किमान दोन महिन्यातून एकदा त्या विभागाशी संबंधित नसलेल्या अधिका-यांद्वारे आणि सहा महिन्यातून किमान एकदा नियंत्रक कार्यालयातील अधिका-यांद्वारे, अवचितपणे, चेस्टमधील शिल्लकांची पडताळणी न केली जाणे<br>(ड) इतर बँकांशी जोडणी असलेल्या शाखांना सुविधा/सेवा पुरविण्यास नकार देणे<br>(ई) जनतेने किंवा जोडलेल्या शाखांनी सादर केलेल्या कमी मूल्याच्या नोटा (रु.५० व त्याखालील मूल्याच्या) स्वीकारण्यास नकार देणे<br>(फ) करन्सी चेस्ट शाखांनी पुनर्वापरासाठी तयार केलेल्या गड्डींमध्ये फाटक्या/खोट्या नोटा आढळणे. | **कराराचे कोणतेही उल्लंघन किंवा सेवेमधील कमतरता ह्यासाठी रु.१०,०००/-.**<br><br>**शाखेव्दारा कराराचा भंग किंवा सेवेमधील कमतरतेचे ५ पेक्षा अधिक प्रसंग घडल्यास रु.५ लाख. अशा दंडाबाबतची माहिती सार्वजनिक केली जाईल.**<br><br>**असा दंड तावडतोब केला जाईल.** |

(ब) वरील **अनियमिततेचा प्रकार ठरविण्यासाठी** असलेले सक्षम प्राधिकरण हे कसुरी करणारी करन्सी चेस्ट/बँक शाखा, जिच्या अधिकार क्षेत्रात येते त्या प्रादेशिक कार्यालयातील इश्यु डिपार्टमेंटमधील प्रभारी अधिकारी असेल.

(क) अशा सक्षम प्राधिकरणाच्या निर्णयाविरुध्द करावयाचे अपील, त्या करन्सी चेस्ट/शाखेच्या नियंत्रक अधिका-याने, संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या प्रादेशिक (क्षेत्रीय) संचालकाकडे, **डेबिट केल्यापासून एक महिन्याच्या** आत करावे आणि ते संचालक ते अपील स्वीकारले/फेटाळले जाऊ शकते काय ह्याबाबत ठरवतील.

(ड) कर्मचारी नवीन/अ-प्रशिक्षित आहेत, कर्मचाऱ्यांना जाणीव नव्हती, सुधारण्याची कारवाई केली आहे/करण्यात येत आहे इत्यादीं कारणांनी दंड माफ करण्याबबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.